सामना पा. न. १

# राष्ट्रवादी कार्यकर्ते ठाम; आम्हाला पवारच हवेत

# अध्यक्षपदाचा निर्णय उद्या




*यशवंतराव चव्हाण सेंटरबाहेर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली.*

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी राष्ट्रीय अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय जाहीर केला आहे, मात्र त्यांनी हा निर्णय मागे घ्यावा म्हणून राष्ट्रवादीचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून दवाव वाढत आहे. अध्यक्षपदी शरद पवारच हवेत अशी ठाम भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी घेतली आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी जी समिती नियुक्त करण्यात आली आहे, त्या समितीची बैठक ५ मे रोजी घेण्याची सूचना शरद पवार यांनी केली आहे. शुक्रवारी होणाऱ्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सरचिटणीस जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. विधानसभेतील मुख्य प्रतोद अनिल पाटील यांनी आमदारकीचा राजीनामा पक्षाकडे पाठवला आहे. पुणे, बुलढाणा, धाराशीव, चंद्रपूर आदी ठिकाणी पदाधिकाऱ्यांनी राजीनामे देण्यास सुरुवात केली आहे. ▪ पान ८



शरद पवारांनीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष पदाचे काम पाहायला हवे अन्यथा राज्याचं काम अजित पवारांनी सांभाळावं आणि दिल्लीतील काम सुप्रिया सुळेंनी पाहावे, असे माझे स्वतःचे मत आहे.

▪ छगन भुजबळ

*मी वरिष्ठांना आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले पाहिजे होते असे मला आता जाणवत आहे. जर मी हा निर्णय सर्वांना विचारून घेतला असता तर स्वाभाविकरीत्या सर्वांनी मला विरोध केलाच असता. म्हणून मी हा निर्णय माझ्या मनाशी एकमत करून घेतला, पण आपण ६ मेची बैठक ५ मे रोजीच घ्या, समिती जो निर्णय घेईल तो मला मान्य असेल.*

▪ शरद पवार

सामना पा. नं. ५

# भारतीय जनता पक्षाचे नवीन पदाधिकारी जाहीर

## १६ उपाध्यक्ष, ६ सरचिटणीस, १६ चिटणीसांची नियुक्ती

## नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, पंकजा मुंडे विशेष निमंत्रित

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – भारतीय जनता पक्षाच्या नवीन प्रदेश पदाधिकाऱ्यांची घोषणा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज भाजप मुख्यालयात पत्रकार परिषदेत केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंकजा मुंडे यांना नव्या कार्यकारिणीत विशेष निमंत्रित बनवण्यात आले आहे.

▪ **उपाध्यक्ष** – माधव भांडारी, सुरेश हाळवणकर, चैनसुख संचेती, जयप्रकाश ठाकूर, ॲड. धर्मपाल मेश्राम, एजाज देशमुख, राजेंद्र गावीत

▪ **सरचिटणीस** – रणधीर सावरकर, ॲड. माधवी नाईक, संजय केनेकर, विक्रांत पाटील, मुरलीधर मोहोळ

▪ **सचिव** – भरत पाटील, ॲड. वर्षा डहाळे, अरुण मुंडे, महेश जाधव

▪ **कोषाध्यक्ष** – आमदार मिहीर कोटेचा

▪ **प्रदेश मुख्यालय प्रभारी** – रवींद्र अनासपुरे

▪ **विभागीय संघटनमंत्री** – उपेंद्र कोठेकर (विदर्भ), मकरंद देशपांडे (पश्चिम महाराष्ट्र), संजय कौडगे (मराठवाडा), शैलेश दळवी (कोकण), हेमंत म्हात्रे (ठाणे)

▪ **विशेष निमंत्रित सदस्य** – केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे, विजया रहाटकर, मुंबई अध्यक्ष आशीष शेलार, राष्ट्रीय प्रवक्त्या खासदार डॉ. हीना गावीत, केंद्रीय व राज्य मंत्रिमंडळातील सर्व मंत्री, राज्यातील सर्व खासदार, आमदार.

लोकमत पु. पा. न. १

# मीरा-भाईंदरमध्ये १४ अतिधोकादायक इमारती

## पावसाळ्याआधी रिकाम्या करण्याचे आव्हान

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिकेने अतिधोकादायक अशा १४ इमारतींची यादी जाहीर केली आहे. त्याशिवाय इमारत रिकामी करून दुरुस्ती करणे आवश्यक असलेल्या इमारतींची संख्या १९ आहे. अतिधोकादायक इमारती पावसाळ्याआधी रिकाम्या करण्याचे आव्हान पालिकेसमोर असून अन्य धोकादायक इमारतींबाबत भूमिकेकडे सर्वांचे लक्ष आहे.

मीरा-भाईंदरमध्ये ग्रामपंचायत व नगर परिषद काळापासून असलेल्या जुन्या इमारतींची संख्या मोठी आहे. पावसाळ्यात धोकादायक आणि जुन्या इमारतींच्या दुर्घटना घडत असून काही प्रकरणात लोकांचे बळी गेले आहेत. यंदाच्या पावसाळ्याआधी महापालिकेने शहरातील जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्यास सांगितले होते. त्याच्या अहवालानुसार पालिकेने शहरातील एकूण ४२९ इमारतींची यादी विविध श्रेणीनुसार तयार केली आहे.

अतिधोकादायक स्वरूपातील १४ इमारतींची यादी पालिकेने जाहीर केली आहे. प्रभाग समिती १ व ४ मध्ये प्रत्येकी एक इमारत, प्रभाग समिती दोन आणि सहामध्ये प्रत्येकी चार इमारती, तर प्रभाग समिती तीनमध्ये पाच अशा एकूण १४ अतिधोकादायक इमारती पालिकेने जाहीर केल्या आहेत. त्यापैकी दोन इमारती तोडल्या असून तीन इमारती तोडण्याचे काम सुरू आहे. रिकामी केलेली एक इमारत असून रहिवासीव्याप्त, पण रिक्त करण्याचे काम सुरू असलेल्या पाच इमारती आहेत, तर चार अतिधोकादायक इमारतींना न्यायालयाकडून स्थगिती आदेश मिळाला आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

सामना पा. नं. ८

# दहिसर टोलनाक्यावर चक्का जाम

## रोजच्या कटकटींमुळे भाईंदरकर संतापले



भाईंदर, दि. ३ (सा.वा.) - मुंबई व भाईंदरच्या वेशीवर असलेला दहिसर टोलनाका हा वाहनचालकांच्या दृष्टीने तसेच नागरिकांसाठीदेखील डोकेदुखी ठरला आहे. या टोलनाक्यावर रोजच अर्धा ते एक किलोमीटर वाहनांच्या रांगा लागत असल्याने भाईंदरकरांची चांगलीच कोंडी होत आहे. त्यामुळे हा टोलनाका लवकरात लवकर अन्य ठिकाणी हलवावा, अशी आग्रहाची मागणी हजारो भाईंदरकरांनी सरकारकडे केली आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने कोणत्याही क्षणी नागरिकांच्या संतापाचा स्फोट होण्याची दाट शक्यता आहे.

दहिसर टोलनाका म्हणजे भाईंदरकरांच्या दृष्टीने जणू शाप ठरला असून 'मरे रोज त्याला कोण रडे' अशी स्थिती झाली आहे. मीरा-भाईंदरकरांना मुंबईत जाण्यासाठी दहिसर चेकनाका हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे मुंबई शहरात जाणाऱ्या व मीरा-भाईंदरमध्ये येणाऱ्या वाहनांची या टोलनाक्यावर रोज मोठी गर्दी असते. त्यामुळे दहिसर टोलनाक्यापासून काशिमीरा पोलीस ठाण्यापर्यंत वाहनांच्या प्रचंड रांगा लागलेल्या दिसतात. या वाहतूककोंडीत एक तास प्रवाशांची लटकंती होत असल्याने मनस्ताप सहन करावा लागत आहे.

वाहतूककोंडीमुळे प्रवासाचा वेळ तर वाढतोच पण इंधनही जास्त लागत असल्याने दहिसर टोलनाक्यावर जाणे म्हणजेच द्राविडी प्राणायाम ठरला आहे. त्याशिवाय दिवसेंदिवस प्रदूषणही वाढत असून त्याचा त्रास मीरा-भाईंदरकरांना होत आहे. या वाहनकोंडीचा विद्यार्थी, रुग्ण, नोकरदार व वयोवृद्ध नागरिक आदींना जास्त फटका बसतो. दहिसर टोलनाक्याची मुदत संपून बराच काळ लोटला तरी टोलनाका सुरू असल्याने प्रवासीदेखील संतप्त झाले आहेत. टोलनाक्यावर नियमानुसार पिवळे पट्टेदेखील मारलेले नाहीत. ठेकेदाराने अपेक्षित पैसे यापूर्वीच वसूल केले असूनही टोलनाका सुरूच आहे.

### तक्रार करूनही दुर्लक्ष

टोल वसुलीच्या नावावर दहिसर टोलनाक्यावर लूट होत असल्याची बाब नागरिकांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्याशिवाय स्थानिक आमदार गीता जैन यांनी मीरा रोड येथे झालेल्या कार्यक्रमात टोलनाक्यापासून नागरिकांची सुटका करावी, अशी आग्रहाची मागणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर केली होती. मात्र फडणवीस यांनी त्यावर चकार शब्दही भाष्य केले नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संशय व्यक्त केला जात आहे.

सामना पा. नं. ८

### तरुणाचा मृत्यू

वसई : वसई पूर्व येथे असलेल्या गोपाल लायक इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये कन्हैया गौड हा तरुण नारळ काढण्यासाठी झाडावर चढला होता. नारळ काढत असताना तोल जाऊन तो खाली पडल्याने त्याचा मृत्यू झाला. याबाबत माणिकपूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सामना पा. नं. ८

### युवक ठार

नालासोपारा : एसी सर्व्हिसिंग करताना खाली पडून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना नालासोपारा येथे घडली आहे. नालासोपारा पूर्व, नागीनदास पाडा येथील शिवशक्ती अपार्टमेंटमध्ये राहणारा फिरोज अन्सारी (२२) हा तरुण एसीचे सर्व्हिसिंग करत असताना दहा फूट उंचावरून खाली पडला होता. उपचारासाठी त्याला केईएम रुग्णालयात दाखल केले होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला.

सकाळ पु. पा. नं. १

# वसई विजयोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

विरार, ता. ३ (बातमीदार) : नरवीर चिमाजी आप्पा यांनी वसईच्या किल्ल्यावर विजय मिळवला, या घटनेला ५ मे २०२३ रोजी २८५ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने वसई-विरार महापालिकेकडून आयोजित शुक्रवारपासून (ता. ५) तीन दिवसीय वसई विजयोत्सव आयोजित करण्यात आला आहे. वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ व वसई विजय स्मारक समिती यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम होणार असून त्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे.

विजयोत्सवानिमित्त ५ ते ७ मे २०२३ पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. वज्रेश्वरी येथून मशालयात्रा दुपारी ४ वाजता निघणार असून ती वसई पारनाका येथे आल्यानंतर मोठी शोभायात्रा पारनाका ते वसई चिमाजी आप्पा स्मारक या दरम्यान निघणार आहे. वसई विजयोत्सवात नरवीर चिमाजी आप्पा स्मारक पूजन होणार आहे. त्यानंतर संध्याकाळी अरुण पेदे वेसावकर आणि मंडळी यांचा 'दर्याचा राजा' हा कोळीगीतांचा कार्यक्रम सादर होणार आहे. बाळ जत्रा, किल्ले बांधणी, रांगोळी आणि शस्त्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. तसेच वसईतील विविध समाजाच्या पारंपरिक खाद्य पदार्थांचे फूड फेस्टिव्हल आयोजित केले आहेत. तीन दिवस वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ६ मे रोजी चौरंग प्रस्तुत अशोक हांडे निर्मित 'आझादी ७५' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली.



विरार : शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या विजयोत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे.

वसईला पर्यटनाचा मोठा वारसा लाभला आहे. स्थानिक पर्यटनाला चालना मिळावी, रोजगारनिर्मिती व्हावी, तसेच येणाऱ्या पिढीला इतिहास समजावा, यासाठी वसई किल्ल्यात विजयोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

- अनिलकुमार पवार,
आयुक्त, वसई-विरार महापालिका

CamScanner

Scanned with CamScanner

सकाळ पा. नं. ४

# बजरंग दलातर्फे आज हनुमान चालिसाचे पाठ

## वाद काँग्रेसच्या जाहीरनाम्याचा; प्रत्युत्तर देण्यासाठी हिंदू संघटनेचा संकल्प




बंगळूर, ता. ३ (वृत्तसंस्था) : काँग्रेसला जोरदार प्रत्युत्तर देण्याचा संकल्प बजरंग दलाने सोडला आहे. त्यासाठी गुरुवारी कर्नाटकमध्ये हनुमान चालिसाचे पाठ आयोजित करण्यात येतील.

काँग्रेसने कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी प्रकाशित केलेल्या जाहीरनाम्यात बजरंग दलावर बंदी घालण्याचे आश्वासन दिले आहे. जात आणि धर्मांच्या आधारावर समाजात शत्रुत्व पसरविणाऱ्यांच्या व्यक्ती आणि संस्थांवर ठोस आणि निर्णायक कारवाई करण्याची ग्वाही काँग्रेसने दिली आहे. यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रातील तसेच कर्नाटकातील सत्ताधारी भाजपच्या अनेक नेत्यांनी काँग्रेसला धारेवर धरले आहे.

या पार्श्वभूमीवर बजरंग दलातर्फे एक निवेदन जारी करण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की, धर्म धोक्यात आला असल्याचा हा काळ आहे. अशावेळी एकमेकांच्या साथीत ठामपणे उभे राहणे हाच भविष्याचा मार्ग आहे. आपण आपले मतभेद बाजूला ठेवून धर्मांच्या रक्षणासाठी एक येऊन पुढाकार घेतला आहे. विश्व हिंदू परिषदेनेही (विहिंप) बजरंग दलाला पाठिंबा दर्शविली आहे.

**दक्षिण कन्नडमध्ये निदर्शने**

मंगळवारी सायंकाळी काँग्रेसच्या मंगळुरमधील दक्षिण कन्नड जिल्हा कार्यालयासमोर बजरंग दलातर्फे निदर्शने करण्यात आली. यावेळी काँग्रेसच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. काँग्रेसच्या जाहीरनाम्याच्या प्रतींचे यावेळी दहन करण्यात आले.

### छत्तीसगडमध्ये बंदीबाबत विचार करू : भूपेश बघेल

रायपूर : छत्तीसगडमध्ये बजरंग दलासंदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या परिस्थितीनुसार विचार करून योग्य कारवाई करण्याचा निर्णय घेतला जाईल. गरज पडल्यास बंदीबाबत विचार करू, असे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी सांगितले. कर्नाटकच्या बाबतीत होणारे निर्णय किंवा कारवाई छत्तीसगडच्या बाबतीत लागू पडेलच असे नाही. याचे कारण दोन्ही राज्यांतील परिस्थिती वेगळी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### बजरंग दल गुंडांची संघटना : दिग्विजय

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह यांनीही या वादात उडी घेतली. त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा संदर्भ देत ट्विट केले. दिग्विजय यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे की, मोदीजी यांचा धर्म हिंदुत्व आहे, जो हिंदू किंवा सनातन धर्म नाही. सावरकरजी यांनी म्हटल्याप्रमाणे जसा हिंदुत्वाचा हिंदू धर्माशी संबंध नाही तसाच बजरंग दलाचा हनुमानाशी संबंध नाही. ती एक गुंडांची संघटना आहे.

### 'काँग्रेसचे आश्वासन लाजीरवाणे'

नवी दिल्ली : बजरंग दलाचे राष्ट्रीय निमंत्रक नीरज दौनेरिया म्हणाले की, बजरंग दलावर बंदी घालण्याचे काँग्रेसचे आश्वासन लाजीरवाणे आहे. समाजाच्या विकास आणि हितासाठी काम करणाऱ्या संघटनेची त्यांनी असंख्य दहशतवादी कारवायांना खतपाणी घातलेल्या गटाशी तुलना केली आहे, जे लाजीरवाणे आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत पा. न. ५


# पोक्सो कायदा 'त्या'साठी नाहीच

## हायकोर्टाकडून तरुणाची जामिनावर सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : लैंगिक अत्याचारापासून अल्पवयीन मुलांचे संरक्षण करण्यासाठी पोक्सो कायदा आहे. सहमतीने प्रेमसंबंधात असलेल्या अल्पवयीन मुलांना शिक्षा देऊन त्यांना गुन्हेगार ठरवण्यासाठी हा कायदा नाही, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने एका २३ वर्षीय तरुणाची जामिनावर सुटका करताना नोंदविले.

मुलगी आणि आरोपीतील संबंध संमतीने होते, असे मुलीच्या आईने दिलेल्या जबाबावरून स्पष्ट होते, असे न्या. अनुजा प्रभुदेसाई यांच्या एकलपीठाने म्हटले. 'घटनेच्या वेळी अर्जदार २२ वर्षांचा तरुण होता. एफआयआरमध्ये दिलेल्या माहितीनुसार, मुलगी व आरोपीतील संबंध संमतीचे होते, असे स्पष्ट होते. अल्पवयीन मुलांचा लैंगिक छळ व अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी तसेच मुलांचे हित व आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी कठोर दंडात्मक तरतुदी असलेला पोक्सो कायदा लागू करण्यात आला आहे. रोमँटिक किंवा सहमतीच्या संबंधात असलेल्या अल्पवयीन मुलांना शिक्षा करून त्यांना 'गुन्हेगार' असे लेबल लावणे, हा या कायद्याचा हेतू नाही,' असे न्या.



प्रभुदेसाई यांनी स्पष्ट केले.

एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार केल्याचा गुन्हा पोलिसांनी इम्रान शेखवर दाखल केला. मात्र, मुलीने हे संबंध संमतीचे होते आणि आपण स्वतःहून पालकांचे घर सोडले होते. अपहरण करण्यात आले नव्हते, असे घरी सांगितले. तरीही आईने मुलीच्या अपहरणाची व तिच्यावर बलात्कार केल्याची तक्रार पोलिसांकडे केली. फेब्रुवारी २०२१ पासून आरोपी कारागृहातच आहे. शेखने जामिनासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

आरोपी गेले एक वर्ष कारागृहात आहे आणि नजीकच्या काळात खटला सुरू होण्याची शक्यता नाही. तसेच आरोपी अट्टल कैद्यांबरोबर राहिल्यास त्याच्या वर्तनावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे मत मांडत न्यायालयाने शेखची सशर्त जामिनावर सुटका केली.

सकाळ पु. पा. नं. ३



वसई : राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाबाहेर कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली.

# अध्यक्षपदीच राहण्याची शरद पवार यांना विनंती

वसई, ता. ३ (बातमीदार) : राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार शरद पवार यांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचे संकेत दिले आहेत. त्याचे पडसाद वसई तालुक्यातही उमटू लागले आहेत. राजीनामा मागे घ्यावा, अन्यथा आमचाही राजीनामा तयार आहे, अशी मागणी राष्ट्रवादीच्या वसईतील कार्यकर्त्यांनी लावून धरली. शहरातील पक्षाच्या कार्यालयाबाहेर बसून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी राजीनामा न देण्याची मागणी केली. या वेळी त्यांच्या भावना अनावर झाल्याचे पाहावयास मिळाले.

शरद पवार यांनी पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा विचार करणे, हे कार्यकर्त्यांना अत्यंत वेदनादायी आणि क्लेशदायक आहे. मनाला होत असणाऱ्या वेदना आम्ही सहन करू शकत नाही आणि पचवूही शकत नाही. राजीनामा मागे न घेतल्यास सर्व कार्यकर्ते पदाचा राजीनामा देणार आहेत. आमचे राजीनामे तयार आहेत, अशी भूमिका वसई-विरार शहर जिल्हाध्यक्ष राजाराम मुळीक यांच्यासह जिल्हाप्रमुख, विविध पदाधिकारी यांनी व्यक्त केली.

लोकमत पा. न. ८

# केरळ स्टोरी ठरणार 'चलनी नाणे'?

## पडद्याआडून चित्रपटाला भाजपने दिले पूर्ण पाठबळ

सुनील चावके

लोकमत न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : दक्षिणेकडील राज्यांमध्ये विरोधी पक्षांचा, विशेषतः काँग्रेसचा राजकीय माया खिळखिळा करण्यासाठी 'द केरळ स्टोरी' हा वादग्रस्त चित्रपट भाजपसाठी 'चलनी नाणे' ठरण्याची शक्यता आहे.

गेल्या पंधरा-सोळा वर्षांत केरळमधील ३२ हजार महिला बेपत्ता झाल्याच्या दाव्यावरून चित्रपट निर्मात्यांनी घूमजाव केले असले, तरी त्याची परिणामकारकता कमी होण्याची चिन्हे नाहीत. पडद्याआडून या चित्रपटाला भाजपचे पूर्ण पाठबळ लाभले आहे. केवळ केरळच नव्हेतर, कर्नाटक, तेलंगणा, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, पुद्दुचेरी या दक्षिणेतील




राज्यांमधील हिंदू आणि ख्रिश्चनांवर 'द केरळ स्टोरी'चा होणारा प्रभाव आमच्या पथ्यावरच पडेल, असा दावा भाजप नेते करत आहेत.

'कोणताही चित्रपट प्रचाराने यशस्वी होत नसतो. चित्रपटाचे भविष्य त्याच्या पहिल्या दोन शोमध्येच निश्चित होत असते,' असे मत केरळ प्रदेश भाजपचे प्रभारी प्रकाश जावडेकर यांनी व्यक्त केले. केरळमधील हिंदू आणि ख्रिश्चन समुदाय भाजपकडे आकर्षित होत असल्याचे जावडेकर यांनी सांगितले.

### निवडणुकीत नवी संधी

- केरळमधील हिंदू आणि ख्रिश्चन मुलींना नादी लावणाऱ्या 'लव्ह जिहाद'च्या चिंताजनक समस्येला या चित्रपटाने हात घातला आहे. ही समस्या ख्रिश्चन समाजाच्या दृष्टीने अधिक संवेदनशील ठरली असून, राज्यातील वाढत्या कट्टरपंथी इस्लामविषयी ख्रिश्चन समाज चिंताग्रस्त आहे.
- या ज्वलंत मुद्द्यावर दाखवलेली उदासीनता केरळमधील काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या अंगलट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये आतापर्यंत निराशाजनक कामगिरी बजावणाऱ्या भाजपला केरळचे दार किलकिले करण्याची संधी मिळणार आहे.

पुढारी पु. पा. न. १

# वसई-विरारमध्ये बेकायदा बांधकामे

वसई : वसई- विरार महानगरपालिका हद्दीत बेकायदा चाळी उभारण्याचे काम चोरीछुपे सुरुच असून पालिका प्रशासनाने पुन्हा एकदा या बांधकामांवर कारवाईचा बडगा उगारायला सुरुवात केली आहे. वसईत सर्वाधिक बेकायदा बांधकामे उभी राहत असून चाळमाफिया वाढत्या लोकवस्तीमुळे बनावट कागदपत्रांचे आमिष दाखवत चाळीतील खोल्या विकत असल्याचेही याआधी उघडकीस आले होते. मात्र, आयुक्तांच्या कारवाईमुळे भूमाफियांचे धाबे दणाणले आहेत.

CS CamScanner
Scanned with CamScanner

पुढारी पु. पा. नं. १

# पोलिसाने कारवाई केली म्हणून दुचाकी जाळली

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

वसई-वाहतूक पोलिसाने कारवाई केली म्हणून संतप्त झालेल्या एका दुचाकीस्वाराने भर रस्त्यात दुचाकी पेटवून दिल्याची घटना वसईत घडली आहे. पोलिसांनी प्रसंगावधान दाखवल्याने कुणी जखमी झाले नाही.

वसई वाहतूक पोलीस विभागातील पोलीस सचिन मोहने सोमवारी संध्याकाळी गोखिवरे येथील नाक्यावर वाहनांची तपासणी करत होते. त्यावेळी एक मोटारसायकल (एमएच ०३ बीव्ही ९७६८) तपासणीसाठी अडवली. दुचाकीस्वार भानूप्रताप पांडे (२९) याच्या मोटारसायकलीचे पीयूसी नव्हते, तसेच विमा संपला होता. तसेच मोटारसायकलीचा क्रमांक फॅन्सी होता. मोहने यांनी दंड भरत नसल्याचे त्याची दुचाकी जप्त केली. त्यामुळे आरोपी पांडे याने वाद घातला. काही वेळाने तो परत आला आणि त्याने मोटारसायकलीची पेट्रोलची टाकी उघडून ती पेटवून दिली. मोहने यांनी नागरिकांच्या मदतीने आग विझविल्याने पुढील अनर्थ टळला.

वालीव पोलिसांनी आरोपी भानूप्रसाद पांडे याला सरकारी कामात अडथळा आणणे तसेच दुसऱ्याच्या जिवातीस धोका उत्पन्न करणे अन्वये गुन्हा दाखल करून अटक केल्याची माहिती वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांनी दिली.

पुण्य नगरी पु. पा. नं. १

# पालिका आयुक्तांनी साधला नागरिकांशी संवाद

**मीरा रोड :** मीरा भाईंदर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी महापालिका मुख्य कार्यालयाचा पाहणी दौरा करत महापालिकेत येणाऱ्या नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करण्यात येतात की नाही, प्रत्येक विभागाची स्वच्छता, निगा राखली जाते की नाही. त्याचबरोबर प्रत्येक विभागाच्या कामकाजाची दखल घेत कामासाठी आलेल्या नागरिकांशी संवाद साधला.

महापालिका नागरी सुविधा केंद्र येथे जन्म-मृत्यू दाखला घेण्यासाठी व समाज विकास विभाग येथे सेवेचा लाभ घेणाऱ्या दिव्यांगांची आयुक्त यांनी विचारपूस केली. नागरिकांना सेवा लाभ घेताना कोणत्या प्रकारची अडचण येते का?, पालिका कर्मचारी नागरिकांना कशा प्रकारची वागणूक देत आहेत, अधिकारी व कर्मचारी वेळेत उपस्थित राहतात का? कामे वेळेत पूर्ण होताहेत का? या प्रकारची विचारणा आयुक्त यांनी नागरिकांकडे केली. तसेच कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास त्याचे तातडीने निवारण करण्याचे आश्वासन आयुक्त दिलीप ढोले यांनी यावेळी दिले.

आयुक्तांनी जाणीपूर्वक विचारणा केल्याबद्दल नागरिकांनी त्यांचे आभार मानले. आयुक्तांनी प्रत्येक विभाग कार्यालयाला भेट देत विभागाच्या कामकाजाची माहिती घेतली. तसेच प्रत्येक कार्यालयाची नीट निगा राखणे, स्वच्छता ठेवण्यासाठी संबंधितांना निर्देश दिले.

पुढारी पा. न. २

# 'द केरला स्टोरी' चित्रपटावर बंदीस सुप्रीम कोर्टाचा नकार

## सिब्बल, पाशा यांची हस्तक्षेप याचिका फेटाळली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

'द केरला स्टोरी' या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. केरळमधील डाव्या लोकशाही आघाडीसह काँग्रेसने या चित्रपटावर हेट स्पीचचा आरोप केला होता.

निझाम पाशा आणि कपिल सिब्बल या वकिलांनी या चित्रपटावर बंदीसाठी सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल केली होती. शुक्रवारी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या ट्रेलरला १६ दशलक्ष व्ह्यूज मिळाले आहेत. हा चित्रपट हेट स्पीचचेच एक उदाहरण आहे, अशी भूमिका या दोघांनी न्यायालयासमोर मांडली.

चित्रपटाला प्रमाणपत्र मिळालेले असून, सेन्सॉर बोर्डाने चित्रपटाच्या प्रदर्शनाला परवानगी दिली आहे. हेट स्पीचच्या व्याख्येतही हा चित्रपट चपखल बसत नाही, असे न्यायमूर्ती के. एस. जोसेफ आणि बी. व्ही. नागरत्ना यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. चित्रपट प्रदर्शित करण्याच्या निर्णयाला आव्हान द्यायचे असेल, तर त्यासाठी अन्य यंत्रणांकडे याचिकाकर्त्यांनी जावे, असेही खंडपीठाने सुचविले. 'द केरला स्टोरी' हा चित्रपट म्हणजे इस्लाम धर्मस्वीकारास भाग पाडून सीरियात पाठवण्यात आलेल्या पूर्वाश्रमीच्या हिंदू मुलीची कथा आहे.

### द केरळ स्टोरी आणि महाराष्ट्र शाहीर चित्रपट करमुक्त करण्याचा विचार : मुनगंटीवार

**मुंबई :** शाहीर साबळे यांच्या जीवनावरील 'महाराष्ट्र शाहीर' आणि द केरळ स्टोरी हा चित्रपट करमुक्त करण्याबाबत सरकार लवकरच निर्णय घेईल, अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. या चित्रपटाला




करमुक्त करावे अशी मागणी केली जात आहे.पण हा विषय सांस्कृतिक विभागाच्या अधिकारात येत नाही. वित्त विभागाच्या माध्यमातून जीएसटी करातून ९ टक्के सूट देता येऊ शकते. यापूर्वी काही चित्रपटांना अशी सूट दिली असल्यामुळे या चित्रपटालाही सूट दिली जावी यासाठी आपण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून विनंती करणार असल्याचे सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. शाहीर साबळे यांच्या जीवनावरील चित्रपट करमुक्त करण्यासाठी केदार शिंदे यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे विनंती केली. सामंत हे शिंदे यांना घेऊन आपल्याकडे आले असता हा चित्रपटसुद्धा करमुक्त करण्यासाठी आपण फडणवीस यांना विनंती करणार असल्याचे मुनगंटीवार म्हणाले.

महाराष्ट्र टाइम्स पु. पा. नं. १

# तृतीयपंथी दलाल अटकेत

**मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदरमधील हॉटेलमध्ये शरीरविक्रयासाठी पुरुष ग्राहकांना तरुणी पुरवणाऱ्या तृतीयपंथी दलालाला नुकतीच अटक करण्यात आली.. मिरा-भाईंदर पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधित कक्षाने ही कारवाई करून महिलेची सुटका केली आहे.

मुंबईतील अंधेरी परिसरात राहणारी तृतीयपंथी दलाल ही पुरुष ग्राहकांना शरीरविक्रयासाठी तरुणी पुरवत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार, पोलिसांच्या पथकाने नुकतेच बोगस ग्राहकाला तृतीयपंथी दलालाकडे शिवार गार्डन परिसरात पाठवून छापा टाकला.. यावेळी तृतीयपंथी दलाल बोगस ग्राहकाला शरीरविक्रयासाठी तरुणींची छायाचित्रे दाखवून त्या बदल्यात पैसे स्वीकारताना आढळला. त्यामुळे तृतीयपंथी दलालाविरोधात मिरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा. न. २

# मविआच्या वज्रमूठ सभांना ब्रेक

## शरद पवारांच्या निर्णयाचा परिणाम; पुढील सभांच्या आयोजनाबाबत संभ्रम

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद सोडण्याच्या निर्णयामुळे महाविकास आघाडीच्या आगामी वज्रमूठ सभांच्या आयोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुण्यातील १४ मे रोजी होणारी सभा पुढे ढकलण्यात आल्याची घोषणा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी केली आहे. मात्र, त्यानंतरच्या सभा होणार का, याबाबत महाविकास आघाडीतच एकमत नसल्याचे चित्र सध्या समोर येत आहे.

**● उन्हाचे कारण देत पुण्यातील सभा पुढे ढकलण्यात आल्याचे राष्ट्रवादीचे नेते सांगत आहेत. तर, ऊन आणि अवकाळी पावसाच्या शक्यतेमुळे पुढच्या सभा काहीकाळ थांबविण्याचा निर्णय झाल्याचे ठाकरे गटातील नेत्यांचे म्हणणे आहे. दुसरीकडे शरद पवारांच्या निवृत्तीच्या घोषणेने मविआच्या वज्रमूठ सभा रद्द झाल्याच्या चर्चांचे संजय राऊत यांनी मात्र खंडन केले आहे. मविआच्या वज्रमूठ सभा अजिबात रद्द झाल्या नाहीत. २८ तारखेची कोल्हापूरची सभा होणार आहे. त्याअगोदर पुण्यातही सभा आहे, ती पण होणार आहे. सध्या पाऊस-पाण्याचे दिवस आहेत, त्यादृष्टीने सभांचे नियोजन सुरू आहे, असा दावा संजय राऊत यांनी केला.**

छत्रपती संभाजी नगरमधील पहिल्या सभेनंतर नागपूर आणि दोनच दिवसांपूर्वी मुंबईत वज्रमूठ सभा पार पडली. या तिन्ही सभांना चांगला प्रतिसाद मिळाला. या पुढची सभा १४ तारखेला पुण्यात होणार होती. मात्र, ही सभा आता रद्द करण्यात आली आहे. उन्हामुळे सभेच्या तारखा बदलण्यात आल्या आहेत. १ मेच्या वज्रमूठ सभेच्या वेळीच तिन्ही पक्षांच्या अनौपचारिक चर्चेत तसा निर्णय घेण्यात आल्याची माहिती, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली. मुंबईतील सभेत व्यासपीठावरच उद्धव ठाकरे, अजित पवार, अशोक चव्हाण, नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांच्यात झालेल्या अनौपचारिक चर्चेत हा निर्णय घेण्यात आल्याचे ते म्हणाले. तर, प्रफुल्ल पटेल यांनीही आपल्या अधिकृत पत्रकार परिषदेत याला दुजोरा दिला.

लोकसत्ता पु. पा. न. १

# वसईतील आणखी ११ अनधिकृत शाळांवर गुन्हे

**वसई :** वसईतील पेल्हार व मालजीपाडा केंद्राच्या भागात उभारण्यात आलेल्या आणखी ११ शाळांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अनधिकृत शाळांच्या विरोधातील कारवाईची मोहीम अधिकच तीव्र करण्यात येत आहे. ज्या-ज्या भागांत अनधिकृत शाळा आहेत, त्यांचे सर्वेक्षण करून थेट गुन्हे दाखल केले जात आहेत. त्यामुळे अनेक शाळा बंद करीत असल्याचे पत्र सादर करीत असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात येत आहे. पालकांनी देखील आपल्या मुलाला शाळेत प्रवेश घेताना संबंधित शाळेला शासनाची मान्यता आहे का? हे तपासावे असे आवाहन वसईच्या शिक्षण विभागातर्फे करण्यात येत आहे.

लोकसत्ता पु. पा. न. १

# महापौर साहाय्यता निधी पडून

## वसई, विरारमधील सर्वसामान्य रुग्ण तीन वर्षे मदतीविना

**सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता**

**वसई–** सर्वसामान्य रुग्णांना महापौर साहाय्यता निधीमधून दिली जाणारी आर्थिक मदत मागील ३ वर्षांपासून बंद आहे. निवडणुका होत नसल्याने या महापौर निधीचे वाटप झालेले नाही. यामुळे शहरातील सर्वसामान्य रुग्ण आर्थिक मदतीपासून वंचित राहिले आहेत.

वसई-विरार महापालिकेची स्थापना २००९ साली झाली. शहरातील सर्वसामान्य गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत देता यासाठी महापौर साहाय्यता निधी ही योजना सुरू करण्यात आली होती. यासाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली एक विश्वस्त समिती बनविण्यात आली होती. शहरात जे गरीब गरजू रुग्ण आहेत त्यांना या महापौर निधीतून आर्थिक मदत करण्यात येत होती. अगदी ५ हजारांपासून २५ हजारांपर्यंतची मदत रुग्णांच्या गरजेनुसार करण्यात येत होती. त्यामुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांना या महापौर साहाय्यता निधीचा फार मोठा आधार होता. वर्षाला ६० लाख रुपयांच्या निधीचे वाटप या महापौर साहाय्यता निधीमधून केले जात होते. महिन्याला ३ ते साडेतीन लाख रुपयांचा निधी गरजू रुग्णांना दिला जात होता.

जुलै २०२० मध्ये नगरसेवकांचा कार्यकाळ संपला. परंतु करोनामुळे निवडणुका झाल्या नाहीत. तेव्हापासून हा महापौर साहाय्यता निधी देण्यात आलेला नाही. तीन वर्षांपासून शहरातील सर्वसामान्य रुग्ण या मदतीपासून वंचित राहिले आहेत.

### निवडणुका होत नसल्याचा फटका

करोनामुळे पालिकेच्या निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे हा निधी पडून आहे. इतर कामे अडली नाहीत. आयुक्तांना प्रशासकांचे अधिकार देऊन बाकी कामे चालू आहेत. मग महापौर साहाय्यता निधी किमान आयुक्तांच्या नावाने तरी सुरू करून रुग्णांची मदत करावी अशी मागणी रुग्णमित्र राजेंद्र ढगे यांनी केली आहे.

“ महापौर साहाय्यता निधी हा सर्वसामान्यांसाठी मोठा आधार होता. परंतु ३ वर्षांपासून तो बंद आहे. महापौर नाही ही तांत्रिक अडचण आहे. त्यासाठी वेगळी तरतूद करायला हवी. निवडणुका होतील, महापौर येईल हा नंतरचा भाग आहे. परंतु सर्वसामान्य रुग्णांची गरज लक्षात घेऊन पालिकेने ताबडतोब महापौर साहाय्यता निधी सुरू करायला हवा

**- प्रवीण शेट्टी**, माजी महापौर, वसई विरार महापालिका

“ महापौर साहाय्यता निधी हा शहरातील नागरिकांसाठी वरदान होता. अनेक रुग्णांना मदत मिळत होती. आता निवडणुकाच होत नसल्याने महापौर नाही आणि त्यामुळे हा निधी देता येत नाही. लवकर निवडणुका होणे गरजेचे आहे

**- नारायण मानकर**, माजी महापौर, वसई विरार महापालिका

CS CamScanner
Scanned with CamScanner

लोकसत्ता पु. पा. नं. १



# नालासोपाऱ्यात वाहतूक कोंडी कायम

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई:** नालासोपारा पूर्वेच्या परिसरात रस्त्यावरील खड्डे, फेरीवाल्यांचे अतिक्रमण, बेशिस्तपणे चालविली जाणारी वाहने यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ लागला आहे. त्यामुळे येथील वाहतूक कोंडीची समस्या कायम असून याचा मोठा फटका प्रवाशांना बसत आहे.

नालासोपारा पूर्वेच्या भागातून महामार्गाला जोडणारा मुख्य रस्ता गेला आहे. या रस्त्यावर वाहनांची वर्दळ अधिकच वाढली असून या भागात सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ लागली आहे. वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी अजूनही पालिकेकडून हव्या त्या प्रमाणात उपाययोजना केल्या जात नाहीत. याचा मोठा परिणाम वाहतुकीवर होऊ लागला आहे. नालासोपारा पूर्वेच्या तुळींज, संतोष भवन, वालईपाडा, धानिव बाग या भागांत सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. मंगळवारी सायंकाळीसुद्धा संतोष भवन ते धानिव बाग परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. जवळपास एक ते दीड तासाहून अधिक काळ प्रवाशांना वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागले. काही ठिकाणी रस्त्याच्या मध्येच वाहने उभी करतात, याशिवाय विरुद्ध दिशेने वाहने चालविणे, काही बेशिस्त रिक्षाचालक मध्येच वाहने टाकतात त्यामुळे वाहतूक कोंडी अधिक होत असते असे येथील नागरिकांनी सांगितले आहे.

यासाठी वाहतूक विभागाने जे बेशिस्तपणे वाहने चालवितात त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## 'रस्ते सुधारणा करा'

नालासोपारा पूर्वेच्या भागातून महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्यावर विविध ठिकाणच्या भागात खड्डे पडले आहेत. तर काही ठिकाणी रस्ता हा उंचसखल असा त्यामुळे येथून वाहनांचा वेग मंदावतो त्यामुळे सातत्याने वाहतूक कोंडीच्या समस्येला तोंड द्यावे लागते. यासाठी ज्या भागात दुरवस्था झालेला रस्ता आहे तिथे पालिकेने दुरुस्ती करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

मुंबई

लोकसत्ता पु.पा. नं. ४

# मिरा-भाईंदर पालिकेत माहिती केंद्र

## सविस्तर अहवाल तयार, सात कोटींचा खर्च अपेक्षित

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेच्या कामकाजाची संपूर्ण माहिती संकलित व्हावी, यासाठी स्वतंत्र माहिती केंद्राची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी हे काम खासगी संस्थेच्या मदतीने केले जात होते.

मिरा-भाईंदर नगरपालिकेचे रूपांतर २००२ मध्ये महापालिकेत झाले, परंतु या महापालिकेचे आर्थिक उत्पन्न अल्प असल्याने तिचा 'ड' वर्गात समावेश होत आहे. निधीच्या कमतरतेमुळे महापालिकेच्या कार्यालयीन कामकाजाची संपूर्ण माहिती बंगळूरुस्थित खासगी संस्थेकडे जमा केली जाते. यात जन्म-मृत्यू नोंद, मालमत्तेची माहिती, विकासकामांची माहिती, अर्ज, आदेश आणि इतर सर्व कागदपत्रांचा समावेश आहे. खासगी संस्थेत माहिती जमा करण्यासाठी किंवा पुन्हा प्राप्त करण्यासाठी महापालिकेला वार्षिक ८० लाख ते एक कोटी रुपये इतका खर्च येतो. त्यामुळे यावर उपाय म्हणून महापालिकेच्याच मालकीचे स्वतंत्र माहिती केंद्र उभारण्याचा निर्णय आयुक्त दिलीप ढोले यांनी घेतला आहे.

> “मिरा-भाईंदर महापालिकेचे स्वतःचे माहिती केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यात महापालिकेच्या सर्व कामकाजाची माहिती नोंदवली जाणार आहे. याशिवाय या केंद्राला जोड म्हणून एक उपकेंद्रही तयार केले जाणार आहे. - **संजय शिंदे,** उपायुक्त, मिरा-भाईंदर महापालिका

माहिती केंद्राची निर्मिती करण्यासाठी अनुभवी सल्लागारांमार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. या केंद्रासाठी प्रशासनाला साधारण सात कोटी रुपये इतका खर्च येणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पातदेखील या कामासाठी तीन कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार या कामाची चाचणी सुरू असून लवकरच केंद्राची निर्मिती केली जाणार आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

# दिव्यांग की पिटाई करने वाला आरोपी गिरफ्तार

**भाईंदर :** 1 मई को महाराष्ट्र दिवस के अवसर पर भाईंदर (प.) में एक गरीब दिव्यांग की एक युवक द्वारा पिटाई किए जाने की घटना जब पुलिस के संज्ञान में आई तो पुलिस ने आखिर उस मनचले युवक को ढूंढ निकाला तथा उसको हवालात बता दी।

प्राप्त जानकारी के अनुसार सद्दाम नामक 22 वर्षीय युवक शारीरिक रूप से दिव्यांग है,और भाईंदर पश्चिम में अपने पूरे परिवार के साथ रह कर ठेले पर फलों को बेचकर अपने परिवार का पेट भरते है, जहाँ एक ओर सद्दाम दिव्यांग होते हुए भी परिस्थितियों से लड़कर मेहनत मजदूरी कर रहे है वहीं दूसरी तरफ कथित आरोपी डिसूज़ा जैसे युवक शारीरिक रूप से सक्षम होने के बावजूद भी अपने बहुमूल्य जीवन को व्यर्थ में खर्च कर रहे है। बहरहाल सोशल मिडिया पर दिव्यांग की पिटाई



का वीडियो वायरल होने के बाद भाईंदर(प.) पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक मुगुट राव पाटिल और उनकी टीम तुरंत हरकत में आ गई और उनके सूत्रों से सबसे पहले पीड़ित सद्दाम को ढूंढा और फिर उसकी शिकायत के आधार पर, आरोपी युवक को हिरासत में लेकर भारतीय दंड संहिता 1860 धारा 379,323,427 और अपंग व्यक्ति अधिकार नियम 2016 के तहत गिरफ्तार कर उसको उसकी असली जगह बता दी।

वरिष्ठ पुलिस निरीक्षक मुगुट राव पाटिल ने MHT संवाददाता को बताया की उक्त आरोपी ने सद्दाम के ठेले पर से बलजबरी से केले उठा लिए और सद्दाम के मना करने के बावजूद भी उसकी पिटाई कर दी। आर.टी.आई. कार्यकर्त्ता कृष्णा गुप्ता ने बताया की वीडियो देख कर मैं व्यथित हो गया था अतः मैंने डीसीपी जोन-1 और भाईंदर पुलिस को रात ही वीडियो भेजकर उचित कारवाई की विनंती की थी, जिस पर पुलिस ने संज्ञान लेकर कुछ सुबह ही पीड़ित विकलांग फलवाले व्यक्ति को पोलिस ठाणे लाकर इस मामले में एफआईआर दर्ज कर आरोपी को गिरफ्तार कर लिया और पुलिस की कार्यवाही प्रशंसनीय है।

Scanned with CamScanner

पुढारी

# गर्मीच्या हंगामात 'एसी'च्या नावाने फसवणूक

## मुंबईकरांना लुटणारा गुजरातचा आरोपी अखेर पोलिसांच्या ताब्यात

**ठाणे : पुढारी डेस्क**

हंगामानुसार नागरिकांना लुटण्यासाठी भामटे सक्रिय झाल्याचे पुन्हा एकदा उघडकीस आले आहे. स्वस्त दरात एसी विक्रीचे आमिष दाखवून ऑनलाईन लुटणाऱ्या आरोपी प्रियांशू रोहित कुमार खत्री (२०, गुजरात) याला व्ही. पी. रोड पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या आरोपीने फेसबूकवर पेज तयार करून मुंबईतील २ जणांची फसवणूक केल्याचे उघडकीस आल्याचे पोलिसांनी सांगितले.

कडाक्याच्या उन्हामुळे नागरिक हैराण होत आहे. या गरमीत पालकर कुटुंबियांना राहत्या घरात एसी लावायची होती. त्यासाठी पालकर यांनी सोशल मीडियावर सर्च केले असता त्याला राजेश इलेक्ट्रो नावाचे फेसबूकवर पेज निदर्शनास आले. त्यावर स्वस्त दरात एसी मिळत



असल्याचे नमूद होते. पालकर यांनी त्या पेजवरील मोबाईल नंबरवर संपर्क साधाला. आयते सावज जाळ्यात अडकल्याची संधी साधून आरोपीने २९ हजार रुपये ट्रान्सफर करण्यास पालकर यांना सांगितले. बाजारभावापेक्षा कमी दरात एसी मिळत असल्याने पालकर यांनी विश्वासाने पैसे ट्रान्सफर केले. मात्र अनेक दिवस झाले तरी एसी घरी न आल्याने फसवणूक झाल्याचे पालकर यांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ व्ही. पी. रोड पोलीस ठाणे गाठले.

या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास उपायुक्त अभिनव देशमुख, एसीपी रवी सरदेसाई, वपोनि किशोर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि राहुल पाटील, वाल्मीक ढोरकुले, अंमलदार संकेत तावडे, प्रतीक शिर्के, खरकडे, पवार यांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान माहिती प्राप्त होताच पोलिसांनी आर्थर रोड परिसरातून आरोपीला अटक केली. आरोपी खत्री याला बुधवारी न्यायालयाने ५ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. हा आरोपी हाती लागल्याने अनेक गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. दरम्यान मुंबईसह राज्यात अनेक ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे घडत असून नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

Thane Edition
May 4, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

पुढारी

# ग्रँण्ट रोडमध्ये १७ लाखांचे एमडी जप्त

## महिला तस्करासह साथीदार अटकेत

ठाणे : पुढारी डेस्क

एमडी बाळगणाऱ्या महिला तस्करासह एकाला अटक करण्यात आली. सदर कारवाई डी. बी. मार्ग पोलिसांनी बुधवारी केली. मोहम्मद शफिक मो. खलील (३४), नाझिया रबिउल इस्लाम ऊर्फ शोभा देवदास मंडल (३२) अशी आरोपींची नावे आहेत. या आरोपींकडून १७ लाख ४० हजार रुपयांचे ५८० ग्रॅम एमडी जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

मुंबई शहर अमलीपदार्थमुक्त करण्यासाठी पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांनी विशेष कारवाईची मोहीम राबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार डी. बी. मार्ग पोलीस ठाण्याचे सपोनि प्रदीप खुडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक अमलीपदार्थ तस्करांवर लक्ष ठेवू लागले. तपासादरम्यान सपोनि राजाराम पोळ यांना ग्रॅन्ट रोड पूर्व स्थानकाजवळ एमडी तस्कर येणार असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार पोउपनि नितीन झाडे, गावकर, अंमलदार पाटील, शिंदे, सांगळे व अन्य पथकाने सापळा लावून दोघांच्या मुसक्या आवळल्या. या कारवाई आणखी गुन्हे उजेडात येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

Thane Edition
May 4, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

लोकमत

## शासनाने निश्चित केलेले भाडे घ्या : अपर जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

# वसईतील रिक्षावाल्यांच्या मनमानीला बसणार चाप

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई-विरार परिसरात मनमानीपणे भाडे आकारणाऱ्या रिक्षाचालकांना चांगलाच चाप बसला असून शासनाने निश्चित केलेले भाडे घेण्याचे निर्देश पालघरचे अपर जिल्हाधिकारी डॉ. किरण महाजन यांनी दिले आहेत. यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

शासनाने निश्चित करून दिलेल्या नवीन रिक्षा भाडेदरानुसार प्रवाशांकडून भाडे आकारण्याबाबत येत्या ८ दिवसात वसई-विरार शहरातील रिक्षा चालक/मालक संघटनेचे पदाधिकारी आणि संबंधितांसोबत संयुक्त बैठक लावून त्यांना कडक सूचना द्याव्यात आणि यावर तत्काळ अंमलबजावणी सुरू करावी, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी डॉ. किरण महाजन यांनी दिले आहेत.



वसई-विरारमधील रिक्षाचालकांनी केलेल्या मनमानी भाडेवाढीमुळे प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

### विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना

वसई-विरार येथील अवैध रिक्षाचालक, वाहतूक नियमांचे उल्लंघन करून रात्री-अपरात्री प्रवाशांशी हुज्जत घालणाऱ्या मुजोर रिक्षाचालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासाठी रात्रीच्या वेळी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. स्टेशन परिसरात रस्त्यावर पांढरे पट्टे लावणे, जप्त केलेली वाहने उभी करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध करून देणे, नवीन भाडेदराचे फलक लावणे, मनुष्यबळ पुरविणे इत्यादी बाबींच्या पूर्ततेसाठी अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

- जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांना काही महत्त्वाच्या कामानिमित्त अचानक बाहेर जावे लागल्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत किरण महाजन यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत रिक्षा भाडेदरवाढीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. दरम्यान, आजही वसई-विरार शहरातील शेकडो प्रवाशांच्या वारंवार तक्रारी येत आहेत.

वसई-विरारमधील रिक्षाचालकांनी केलेल्या अघोषित आणि मनमानी भाडेवाढीसंदर्भात आणि इतर विविध बाबींसाठी प्रहार जनशक्ती पक्षाने आंदोलन पुकारल्यानंतर शासनाने रिक्षा प्रवासाचे भाडेदर निश्चित केले होते, मात्र शासनाने निश्चित करून दिलेले दर हे येथील रिक्षाचालक/मालकांना मान्य नसल्यामुळे त्यांनी हे आदेश पायदळी तुडवत प्रवाशांची आर्थिक लूट सुरूच ठेवली आहे. प्रहारकडून याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

या भाडेदरवाढीसंदर्भात आणि इतर विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यासाठी पालघरचे अपर जिल्हाधिकारी किरण महाजन यांच्या अध्यक्षतेखाली प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात एक बैठक संपन्न झाली. या बैठकीस प्रहार जनशक्ती पक्षाचे पालघर जिल्हाध्यक्ष हितेश जाधव, वसई तालुकाध्यक्ष दुशांत पाटील, विरार शहर अध्यक्ष अतुल सावंत भोसले, प्रहार जनशक्ती पक्षाचे रवी कुमावत, अरविंद राय, कमलेश सिंग, चेतन चव्हाण, मनीषा जाधव, नूतन गौड त्याचप्रमाणे उपप्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी, पोलिस अधिकारी, वाहतूक शाखेचे अधिकारी, मनपाचे अधिकारी उपस्थित होते.



Scanned with CamScanner

लोकमत

# ईडीची बनावट नोटीस, आरोपीला पोलिस कोठडी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : एका बड्या विकासकास ईडीची बनावट नोटीस दाखवून ६ कोटी ५५ लाखांच्या खंडणीप्रकरणी दाखल गुन्ह्यात काशिमीरा पोलिसांनी बुधवारी पहाटे राजू हमीरमल शाह या आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीला ठाणे न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी दिली.

आनंद अग्रवाल, हरीश उर्फ मोंटू अग्रवाल या विकासकांना ईडीची बनावट नोटीस दाखवून ६ कोटी ५५ लाखांच्या खंडणीसाठी धमकवणाऱ्या इस्टेट एजंट गौतम अग्रवाल (अंधेरी), मितेश शाह (भाईंदर) व राजू हमीरमल शाह (भाईंदर) या तिघांविरुद्ध काशिमीरा पोलिसांनी खंडणीचा गुन्हा दाखल केला. वरिष्ठ निरीक्षक संदीप कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू होऊन दिल्लीतूनन बनावट ईडी नोटीस बनवणाऱ्या कृष्णकुमार ओमप्रकाश कौशिक याला सहायक निरीक्षक प्रशांत गांगुर्डे यांच्या पथकाने अटक केली होती. दरम्यान, राजू शाह याचा अटकपूर्व जामीन ठाणे न्यायालयाने फेटाळून लावला होता.

## याचिकेवर ताशेरे

राजू शाह याच्यावर भाईंदर पोलिस ठाण्यात नऊ गुन्हे दाखल असून उच्च न्यायालयाने २०१७ साली शाहने दाखल केलेल्या एका जनहित याचिकेवर ताशेरे ओढत त्याला १ लाखांचा दंड ठोठावला होता. या बाबी न्यायालयासमोर मांडत शाह याची सात दिवसांची कोठडी मागितली होती. मात्र न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे. या गुन्ह्यातील ही दुसरी अटक आहे.

Mumbai Main
Page No. 4 Apr 27, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner